**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री तुळजाभवानी शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २६५, २६६, २७२, २७४, २७५ आडगाव दराडे आणि गट क्रमांक २८, २९, ३० राजुरा, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता — १२५० टीसीडी वरुन ३५०० टीसीडी, सहवीजनिर्मिती ३.० मेगावॅटवरुन ६.५ मेगावॅट आणि प्रस्तावित २५० किलो लिटर प्रतिदिन उसाच्या रसावर / २०० किलो लिटर प्रतिदिन बी-हेव्ही / २०० किलोलिटर प्रतिदिन सी-हेव्ही मळीवर आधारित क्षमतेचा नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री तुळजाभवानी शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २६५, २६६, २७२, २७४, २७५ आडगाव दराडे आणि गट क्रमांक २८, २९, ३० राजुरा, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारीकरण ऊस गाळप क्षमता — १२५० टीसीडी वरुन ३५०० टीसीडी, सहवीजनिर्मिती ३.० मेगावॅटवरुन ६.५ मेगावॅट आणि प्रस्तावित २५० किलो लिटर प्रतिदिन उसाच्या रसावर २०० किलो लिटर प्रतिदिन बी-हेवी / २०० किलोलिटर प्रतिदिन, सी-हेवी मळीवर आधारित क्षमतेचा नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री श्रीपाद रा. कुलकर्णी, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. अनुराधा ढालकरी, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, परभणी तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री सुजीत ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर, तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, माध्यमांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. श्री तुळजाभवानी शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २६५, २६६, २७२, २७४, २७५ आडगाव दराडे आणि गट क्रमांक २८, २९, ३० राजुरा, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारीकरण ऊस गाळप क्षमता – १२५० टीसीडी वरुन ३५०० टीसीडी, सहवीजनिर्मिती ३.० मेगावॅटवरुन ६.५ मेगावॅट आणि प्रस्तावित २५०.० किलो लिटर प्रतिदिन उसाच्या रसावर २०० किलो लिटर प्रतिदिन बी-हेव्ही / २०० किलोलिटर प्रतिदिन सी-हेव्ही मळीवर आधारित क्षमतेचा नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए आसवणी - ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेणे आहे .

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १६-०६-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ३०-०६-०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, परभणी, यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी बुधवार, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० घेण्यास वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं.ई-६१/२०२३, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०८३१एफटीएस-०००२, दिनांक ३१-०८-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, परभणी, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **संयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक "सकाळ" यात मराठी मध्ये व राष्ट्रीय वृत्तपत्र "द टाईम्स ऑफ इंडिया" यात इंग्रजी मध्ये जनसुनावणीबाबत दिनांक २८-०८-२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचे संबंधित सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, परभणी,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-सेलू, तालुका- सेलू, जिल्हा- परभणी,

६) ग्रामपंचायत कार्यालय – आडगाव दराडे आणि राजुरा तालुका- सेलू, जिल्हा- परभणी,

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं.ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रस्ता, परभणी-४३१ ४०१

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी यांना श्री रंगराव कोथाकोंडा, सेव्ह अर्थ मेट्रो अर्बन अँड रूरल डेव्हलपमेंट सोसायटी, सरुर नगर, जिल्हा रंगारेड्डी, तेलंगना राज्य यांची सूचना दि. ०२-१०-२०२३ च्या ई-मेल द्वारे प्राप्त झाली आहे. सदर सूचना जनसुनावणी समिती समोर विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

संयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

संयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात लेखी सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्पाचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याद्वारे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यानंतर त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी एकूण गुंतवणूक रुपये २०९.१७ कोटी अपेक्षित असून पर्यावरण व्यवस्थापनासाठी प्रस्तावित

भांडवली गुंतवणूक - रुपये ५२.८९९४ कोटी तर आवर्ती गुंतवणूक - रुपये ७.३५३८ कोटी रुपये असेल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पात १५० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार असून प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरणानंतर संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री रवी धनवडे, राहणार-पार्डी, तालुका-सेलू, जिल्हा-परभणीः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | उत्पादन प्रक्रियेत कारखान्यात कंपोस्ट खत तयार होईल ते कंपोस्ट खत स्थानिक शेतक-यांना मिळेल काय? | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्प उत्पादन प्रक्रिया सुरु झाल्यानंतर प्रकल्पात कंपोस्ट खत तयार करण्यात येईल. ते स्थानिक आणि आजूबाजूच्या शेतक-यांना मागणी केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल. |

**२) श्री त्र्यंबक मुळे, राहणार- इरळद, तालुका-मानवत,जिल्हा-परभणीः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | हा जो प्रकल्प उभा करणार आहात, त्यामुळे ऊस बागाईतदारांना ऊसाचा दर | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | चांगला मिळेल हीच आमची साखर कारखान्याकडून अपेक्षा आहे. | |

३) **श्री वाहेद खान हमीद खान पठाण, ग्रामपंचायत सदस्य, वालूर, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | जर इथेऩॉल उत्पादनास अनुमती मिळाली, तर ऊसपीकाला चांगला भाव मिळेल आणि आपण महाराष्ट्रात ऊसाला भाव देण्यात कमी पडणार नाही. शेतक-यांना फायदा होईल. हा वालूर व इतर भाग आहे, तो खेड्यापाड्याचा असून मागास भाग आहे. प्रकल्पामुळे नवे चैतन्य या भागात आलेले असून रोजगार निर्मिती सुध्दा झालेली आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

४) **श्री ज्ञानदेव दत्ता जायभाये, मुक्काम- आडगाव दराडे, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझा एवढीच विनंती आहे की या प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता देण्यात यावी आणि आमचे गांव जवळ असल्याने कमीतकमी ६००-६५० हेक्टरवर ऊसाचे उत्पादन होईल, त्यामुळे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आमचा शेतक-यांचा फायदा होईल. तरी प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता देण्यात यावी. | |

५) **श्री गंगाधर प्रभाकर गिरी, राहणार- पार्डी, तालुका-सेलू, जिल्हा-परभणीः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी कारखाना परिसरातील रहिवाशी शेतकरी असून प्रस्तावित प्रकल्प उभारल्यानंतर प्रकल्पातील चिमणीतून जो धूर बाहेर पडेल, त्यामुळे परिसरातील पीकांवर काही दुष्परिणाम होईल काय? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात सांगितल्यानुसार सदरहू प्रकल्प हा झेडएलडी – झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. चिमणीतून जो धूर बाहेर येईल, त्यातील धुलीकण अडकविण्यासाठी चिमणीस ईएसपी – इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर हे सर्वात अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ईएसपीची कार्यक्षमता ही ९९.९% आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांना हवा प्रदूषणाचा त्रास होणार नाही. त्याचप्रमाणे पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी मंजूर केलेल्या प्रयोगशाळेतून पारित केलेल्या निर्देशांनुसार वेळोवेळी परिक्षण करण्यात येणार आहे. त्यामुळे पीकांवर कुठलाही दुष्परिणाम होणार नाही. |

**६) श्री अंकुश नाथराव जाधव, राहणार-डुगरा, तालुका-सेलू, जिल्हा-परभणी:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण कारखाना परिसरात किती झाडे लावणार आहात? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पासाठी आपण ३५% एवढी जागा ही हरित पट्टा विकासासाठी ठेवलेली आहे. एकूण झाडे १९,७७५ एवढी असणार आहेत. त्याचप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या निर्देशांनुसार विविध प्रजातींची झाडे लावण्यात येतील. तसेच प्रकल्पाच्या चारी बाजूंनी जास्तीतजास्त झाडे लावण्यात येतील. |

**७) श्री कृष्णा शिवाजी जायभाये, राहणार-आडगाव दराडे, तालुका-सेलू,जिल्हा-परभणी:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रस्तावित प्रकल्पात किती लोकांना रोजगाराची संधि मिळू शकेल? | प्रकल्प प्रवर्तक - प्रकल्पाच्या अध्यक्षा यांनी सांगितले की प्रकल्प व्यवस्थापन प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि व स्थानिक परिसराचा विकास करण्यासाठीच प्रकल्प विस्तारिकरण आणि नविन आसवणी प्रकल्पाची उभारणी करत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्पात १५० लोकांची गरज लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अहर्ता स्थानिकांजवळ असल्यास त्यांना निश्चितच प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्पातील रोजगार हा भूमीपुत्रांनाच देण्यात येईल. मात्र प्रकल्पात लागणा-या तज्ज्ञ व्यक्ती जर स्थानिक उपलब्ध नसतील, तर त्या बाहेरच्या परिसरातील घ्याव्या लागतील. |

**८) श्री रामेश्वर सुदामराव काटोळे, राहणार-हट्टा, तालुका-सेलू, जिल्हा-परभणीः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्प मंजूरी देणा-या अधिका-यांना कळकळीची विनंती करण्यात येते की आम्हांला चार पाण्याचे स्त्रोत आहेत. एक दुधना नदी, दुसरा लोअर दुधना प्रकल्प, शेजारचे निवळी धरण आहे आणि सिध्देश्वर धरण आहे. तसेच पाठीमागे येलदरी धरण आहे. त्यामुळे आम्ही मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन करु शकतो, मात्र आज ऊस उत्पादन करण्यात येत नाही, कारण येथे साखर कारखाना नाही. हा कारखाना महाराष्ट्रात नंबर एकचा होऊ शकतो, कारण येथे बैलगाडी तोडसुध्दा जास्त प्रमाणात आहे. येथे पाणी मुबलक असून स्थानिक शेतक-यांना ऊस कोठे न्यावा हा प्रश्न पडतो. तरी प्रकल्पास मंजुरी | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | दिल्यास हा कारखाना महाराष्ट्रात एक नंबरवर राहिल. त्याचप्रमाणे सहवीज उत्पादन प्रकल्प व इतर प्रकल्पास मंजूरी मिळाल्यास स्थानिकांना रोजगार मिळेल, शेतक-यांचा फायदा होईल. आमच्याकडे साखर कारखाना, उद्योग नाहीत. या प्रकल्पामुळे आमच्या परिसराचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. हा प्रकल्प आमचा आशेचा किरण आहे. या प्रकल्पाची भविष्यात मॉडेल म्हणून नोंद होईल असा विश्वास आम्हांला आहे. | |

**९) श्री सुनंदा रेड्डी, शिवाजीनगर, नलगोंडा, तेलंगणाः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी असा पर्यावरणवादी आहे की जो औद्योगिक विकास, औद्योगिकीकरणास पाठिंबा देतो. माझ्या मते, बेरोजगारी हे समाजातील मोठे प्रदूषण आहे. भारतात दरवर्षी एक कोटी लोक रोजगारासाठी उपलब्ध होतात, त्यापैकी फक्त पाच लाख लोकांना सरकारी नोकऱ्या मिळत आहेत. उर्वरित ९५ लाख बेरोजगार खाजगी उद्योगांवर अवलंबून आहेत. ही वस्तुस्थिती आहे आणि या संदर्भात मी सशर्त औद्योगिक विकासाचे समर्थन करतो. येथे मी काही सूचना देत आहेः- | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २) | प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागाराने ३३% वृक्षारोपण प्रस्तावित केले आहे. अधिक वृक्षारोपण करणे शक्य असल्यास कृपया ४०-५०% हरितपट्टा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. सामान्य झाडे लावण्याऐवजी, कृपया फळ देणारी झाडे आणि औषधी मूल्याच्या झाडांना प्राधान्य देण्यात यावे. त्याचा समाजाला खूप उपयोग होतो. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| ३) | कंपनीचे अधिकारी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी आणि ग्राम अधिकारी यांच्यासमवेत CSR बजेट खर्च करण्यासाठी एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती मी व्यवस्थापनाला करत आहे, ज्यामुळे व्यवस्थापनाला मोठी विश्वासार्हता येते. शेवटी, मी जनसुनावणी समितीला विनंती करत आहे की त्यांनी उद्योगाला बिनशर्त एनओसी देण्याची शिफारस करावी. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

संयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक काही विचार, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

संयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत श्री रंगाराव कोथाकोंडा, सेव्ह अर्थ, सरूर नगर, जिल्हा-रंगारेड्डी, तेलंगणा राज्य या स्वंयसेवी संस्थेकडून (एनजीओ) एक लेखी सूचना प्राप्त झालेली असून ती पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर सादर करण्यात आलेली असून प्रकल्प प्रवर्तकांना त्याबाबत लेखी उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून उत्तर बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल. त्यांनी सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली .

**१०) श्री सुजित ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

सर्वप्रथम येथील उपस्थित नागरिकांचे अभिनंदन करण्यात येते की सादरीकरण अतिशय शांततापूर्वक ऐकून प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रश्न विचारले. कारखाना व्यवस्थापन व प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी समर्पक उत्तरे दिलेली आहेत. आजची जनसुनावणी ही प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याबाबतीचा एक महत्वाचा टप्पा होता. या बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येईल. त्यात बैठकीत उपस्थित करण्यात आलेले प्रश्न व त्यास देण्यात आलेली उत्तरे यांचा समावेश करण्यात येईल. प्राप्त झालेल्या लेखी सूचना व त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे, सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा सर्व दस्तावेज अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदस्य, जनसुनावणी समिती यांनी पुढे सांगितले की, बैठकीच्या सुरवातीस संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितल्या प्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही स्थानिकांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी असलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यास व तो अहवाला शासनास सादर करण्यासाठी गठित करण्यात आलेली असून सदरहू समितीस प्रकल्पास मान्यता, शिफारस देण्याचा वा मान्यता नाकारण्याचा अधिकार नाही. पर्यावरण अनुमती मंजूर करणे या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आणि प्रकल्पाविषयी सादरीकरण हे योग्य प्रकारे करण्यात आलेले आहे. त्यानंतर त्यांनी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढील सुत्रे हाती घेण्याची विनंती केली.

बैठकीचा समारोप करताना **अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या जनसुनावणीस आपण येथे उपस्थित आहोत. सादरीकरणात प्रस्तावित प्रकल्पाविषयी, प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) विषयी सर्व माहिती सांगण्यात आली. बैठकीत उपस्थितांकडून तोंडी प्रश्न व एक लेखी सूचना प्राप्त झालेली असून उपस्थित अजूनही लेखी सूचना, आक्षेप नोंदवू शकतात. आताच सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीच्या इतिवृताबाबत जी माहिती दिली त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. उपस्थितांनी प्रकल्पाबाबत सकारात्मक विचार, सूचना दिलेल्या आहेत. अतिशय शांततापूर्वक स्थानिक शेतकरी, उपस्थितांनी आपले विचार मांडले.

त्यानंतर अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांचे आभार मानून जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्षा यांचे आभार मानून अध्यक्षांच्या सूचनेनुसार जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेली एक लेखी सूचना सोबत जोडली आहे.

**(श्री श्रीपाद रा. कुलकर्णी)**
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, परभणी

**(श्री सुजीत ढोलम)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

**(श्रीमती अनुराधा ढालकरी)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, परभणी,
जिल्हा - परभणी

**Additional Dist. Magistrate
Parbhani.**